सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन
# सहसंचालक,तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,नागपूर

शासकिय तंत्र निकेतन परिसर, सदर, नागपूर.
**दुरध्वनी क्र. ०७१२-२५५७२६६ / ४६**
E-mail : ronagpur@dtemaharashtra.gov.in Website : www.rdtenagpur.org.in

क्रमांक :- तंशिस/विकाना/शैवि-२/२०२२/3374 दिनांक:- 25 OCT 2022

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व अभियांत्रिकी (पॉलिटेक्निक)
पदविका संस्था, नागपूर विभाग
नागपूर

विषय:- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील संचालनालयांतर्गत असलेल्या पदविका अभ्यासक्रमात प्रवेशित विद्यार्थ्यांची ऑनलाईन प्रवेश पडताळणी व प्रवेश मान्यतेची प्रक्रिया...

संदर्भ:- १) संचालक,तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांचे पत्र क्र. १०/एडीएम/पदविका प्रवेश यादी/२२-२३/८९०, दिनांक २१/१०/२०२२

उपरोक्त संदर्भीय विषयाच्या अनुषंगाने, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील प्रथम वर्ष पोस्ट एस. एस. सी अभियांत्रिकी पदविका, थेट व्दितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया संचालनालयामार्फत पूर्ण झालेली आहे. त्यास अनुसरुन शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील सर्व शासकीय, अशासकीय अनुदानित, विद्यापीठ विभाग, विद्यापीठ नियंत्रित संस्था, खाजगी विनाअनुदानित संस्थामधील या पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश याद्यांची पडताळणी करुन ऑनलाईन पध्दतीने अंतिम मान्यतेसाठी संचालनालयास सादर करावयाच्या आहेत.

**ऑनलाईन पडताळणी बाबत संस्थांनी करावयाची कार्यवाही :-**

१) संस्थांनी त्यांच्या Login मधून प्रवेशित विद्यार्थ्यांची यादी तपासून व बरोबर असल्याची खात्री करुन ती यादी Online पध्दतीने दिनांक ०५/११/२०२२ पर्यंत सादर करण्यात यावी.
२) सदर यादी संस्थेच्या Login मध्ये उपलब्ध असून यादी Forward करण्याअगोदर Cut Off दिनांकानंतर संस्थास्तरावर प्रवेश रद्द झाला असल्यास त्याची नोंद Mark for Cancellation ही Link वापरुन करणे अत्यंत आवश्यक आहे.

तरी आपणांस सूचीत करण्यात येते की, सदर प्रवेश याद्या या कार्यालयांस तीन (०३) नस्तीसह दिनांक ०५/११/२०२२ पर्यंत सादर करण्यात याव्यात.

सोबत- संदर्भीय पत्र

(डॉ.मनोज भा.डायगव्हाणे)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,
नागपूर